महाराष्ट्र शासन

# अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे कार्यालय

पत्रव्यवहाराचा पत्ता :- प.पु.डॉ.केशव बळीराम हेगडेवार भवन इमारत, पहिला माळा, मॅक्सस मॉलच्या मागे, अमृतवाणी रोड, भाईंदर (प)- ४०१ १०१. तालुका-ठाणे, जिल्हा- ठाणे.

दुरध्वनी क्र. ०२२-२८१८५९१६ ईमेल आयडी-tahmirabhayander@gmail.com

क्र.महसुल/ कांदळवन/कावि-१२६५/२०२० दिनांक :११/०३/२०२०

प्रति,

मा.उप वरनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई

विषय : भाईंदर पश्चिम रेल्वे स्टेशन जवळ सीआरझेड च्या मोकळ्या जमिनीवर माती भराव बंद करणेबाबत.

सी.आर.झेड की खाली पडी जमीनपर अवैध तरिके से मिट्टी भरनी कर चलाये जा रहे पार्किंग व दुकान को बंद कराकर जमीन मुक्त करने हेतु

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 361
दिनांक 19-10-2020

संदर्भ : कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडे अर्जदार श्री. चतुर्भुज शिवसागर पांडे (हिंद सागर) यांनी दाखल केलेली तक्रार अ.क्र.८१

कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती यांचेकडे श्री. चतुर्भुज शिवसागर पांडे (हिंद सागर) यांनी दाखल केलेली तक्रार या कार्यालयास ई-मेलव्दारे प्राप्त झालेली आहे. (तक्रार अ.क्र.८१ )

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने मा.अध्यक्ष, कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीने वनविभाग, पोलीस निरीक्षक, उप अधिक्षक, भूमी अभिलेख, मिरा भाईंदर महानगरपालिका व तक्रारदार यांचेसोबत स्थळपहाणी करुन त्याबाबचा अहवाल देण्याबाबत निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने दि.०५/०३/२०२० रोजी स्थळपाहणी निश्चित करणेत आली.

त्यानुसार स्थळपाहणी दरम्यान उप-नमक अधीक्षक श्री. विजय बहादुर अग्रवाल, तक्रारदार श्री. चतुर्भुज शिवसागर पांडे (हिंद सागर), मिरा भाईंदर मनपा चे कनिष्ठ अभियंता श्री. अरवींद हरीश्चंद्र पाटील, मिरा भाईंदर मनपा चे कनिष्ठ अभियंता प्रभाग क्र. २ श्री. प्रशांत जानकर, मंडळ अधिकारी भाईंदर श्री.दिपक अनारे व तलाठी सजा भाईंदर श्रीम. अनिता पाडवी यांनी तक्रारदार यांचे समवेत विषयांकित जागेची दि.०५/०३/२०२० रोजी स्थळपहाणी केली असुन मंडळ अधिकारी भाईंदर यांनी त्यांचेकडील पत्र जा.बा.नि.क्र.२२५, १९/२०२० दि.०५/०३/२०२० अन्वये खालील प्रमाणे एकत्रित स्थळपहाणी अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

स्थळपाहणी दरम्यान अर्जदार यांनी दाखविलेले सदर ठिकाण भाईंदर स्टेशन पश्चिम येथील असून डी.पी. प्लॅन मध्ये पाहिले असता सदर ठिकाण मौजे भाईंदर स.नं. ३४० चे असलेबाबत दिसून आले. सदर जमीन मिळकत न.स.नं. ३४०/१ क्षेत्र १९-२१-०० हे.आर, ७/१२ चे कब्जेदार सदरी बंदरवाडी आगार व न.स.नं. ३४०/२ क्षेत्र ०-६३-० हे.आर. ७/१२ चे कब्जेदार सदरी बंदरवाडी आगार अशी नोंद आहे. सदर जमीन बंदरवाडी आगार सॉल्ट डिपार्टमेंट, (केंद्र शासन) यांचे मालकीचे आहे. तसेच सदर जमीन मिठागरासाठी परवाना धारक श्री. विरेंद्र चंद्रकांत शहा, हेमंत चंद्रकांत शहा, प्रशांत चंद्रकांत शहा व इतर यांना दिलेली आहे अशी उप-नमक अधीक्षक श्री. विजय बहादुर अग्रवाल यांनी माहिती दिली. सदर स.नं.ची जमीन भाईंदर स्टेशनच्या पश्चिमेस रोडच्या लगत असुन सदर जमिनीवर आज रोजी गुरुलंच होमच्या लगत खालीलप्रमाणे अनाधिकृत दुकानाचे पत्रा शेड असलेले गाळ्याचे बांधकाम केलेले आहेत.

| अ.क्र. | दुकानाचे नाव व दुकान मालकाचे नाव | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १ | सुरती घोटाला श्री. दिनेश कंठारीया | ८१६९४५७८५८ |
| २ | पुष्पक शॉप श्री. अजित सिंग | ९९२०९६९६८६ |

| | | |
|---|---|---|
| ३ | पुष्पक पान शॉप श्री. निलेश शहा | ९९२०९६९६८६ |
| ४ | नारायण भुवन हॉटेल श्री. रत्नाकर शेट्टी | ९८२०१९६९६४ |
| ५ | नारायण पान शॉप श्री. शरद शेट्टी | ८२९१०८४६०५ |
| ६ | माँ मोबाईल शॉप श्री. मुकुंज फरीया | ७६७८०३३३०० |
| ७ | श्री महालक्ष्मी पान स्टॉल श्री. मिशरीलाला यादव | ९८९२७२७५६३ |
| ८ | श्री महालक्ष्मी स्वीट्स श्री. मिशरीलाला यादव | ९८९२७२७५६३ |
| ९ | बॅक २ बॅक कपड्याचे शॉप श्री. सुनील सुरेंद्रसिंग यादव | ९९६९१३०५७३ |
| १० | ऑनली फॉर यु कपड्याचे दुकान अजीज शेख | ९८९२२०४४८० |
| ११ | बॅरोन कपड्याचे दुकान श्री. उस्मान शेख | ८०९७३२१९१९ |
| १२ | नित्यानंद श्री. पुनम अनील पाटील | ९०७६६७२२७० |
| १३ | रि लोड कपड्याचे दुकान श्री. जरशद शेख | ८०९७७१०३१७ |
| १४ | पे ॲण्ड पार्किंग श्री. हेमंत चंद्रकांत शहा | ९८९२२९२२१३ |
| १५ | फॅशन मॉल कपड्याचे दुकान श्री. मनोज शेट्टा | ९८९२०१८२४२ |
| १६ | द जोकर फॅशन हाऊस श्री. मिलन म्हात्रे | |
| १७ | डी.टी.डी.सी.श्री. अल्पेश पडशाला | ८८५०४२१७८० |
| १८ | बेरॉन कपड्याचे दुकान श्री. रईस शेख | ९१३६३०१२५४ |
| १९ | ताडीमाडी केंद्र श्री. राजेश लक्ष्मण जोगीन | ९००४६१५१७१ |
| २० | ओम साई ऑटो अरवींद वर्मा | ८२८६८७६६६६ |

वरीलप्रमाणे एकूण १९ दुकाने असुन सदर सर्व दुकाने भाईंदर स्टेशन पश्चिम बाजुस स.नं. ३४० या जमिनीवर झालेले आहेत. तसेच सदर दुकानाच्या मागील बाजुस दुचाकी पार्किंग असून मालक श्री. हेमंत चंद्रकांत शहा यांचे असलेबाबत पंचांनी सांगितले. सदर पार्किंगचे क्षेत्र २० ते ३० गुंठे दिसुन येते. सदर दुकानांचे मागे खाडीचे पाणी साठलेले असून काही क्षेत्रात मिठागरसाठी केलेल्या कोंडी दिसुन आले. आज रोजी सदर जमिनीवर कुठलेही प्रकारचे कांदळवनाचे नुकसान झालेले दिसुन येत नाही. परंतु सदर एसटी कॅन्टीन लगत डेब्रीज व माती भराव अंदाजे ३ ते ४ डंपर केलेला असून त्यावर प्लॅस्टीक व बांबु पत्र्यांचे दुकाने दिसुन आले. (वरील यादीतील अ.क्र. १, २, ३ यांचे) तरी सदर स.नं. चा महानगर पालिकेकडुन व सॉल्ट डिपार्टमेंट यांचेकडून अभिप्राय घेणे आवश्यक वाटते. जागेवर उपस्थित असलेले श्री. यशल हेमंत शाह यांनी मा. जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांचेकडील आरईव्हीआय/टी-१३ अपील डेस्क एलआरसी-२०(२) एसआर- १/२ ओफ १९९०, दि. १५ मार्च १९९५ व मा. उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील सिविल ॲप्लिकेशन नं. १८७७ ऑफ २००५ समक्ष जागेवर सादर केले. तरी या तक्रारी अर्जातील विषयाबाबत सदर स.नं. ३४० या जमिनीवर झालेले बांधकाम सॉल्ट डिपार्टमेंट यांची जमीन असल्यामुळे त्यांचे मार्फत निष्कासित करणे योग्य होईल असे वाटते. तसेच या पाहणीमध्ये कांदळवन नुकसान झालेले दिसून येत नाही.

तरी प्रकरणी कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती यांचे निर्देशानुसार वरीलप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करीत आहोत. सोबत उपस्थित असलेल्या सदस्यांची यादी, मंडळ अधिकारी भाईंदर यांचेकडील मूळ अहवाल सादर केलेला आहे.

**(डॉ. नंदकिशोर देशमुख)**
**अपर तहसीलदार मिरा-भाईंदर**

प्रत : मा.जिल्हाधिकारी ठाणे (महसूल शाखा) यांजकडे माहितीस्तव सविनय सादर